# Annual Report 2017-18



## Let's Enrich Co-operation With

**Buldana Urban**
Co-op. Credit Society Ltd., Buldana

**बुलडाणा अर्बन**
को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., बुलढाणा

र. नं. २६७ (Multistate)

ISO-9001:2000 SA-8000:2001 प्रमाणित

# : संचालक मंडळ :



**श्री.राधेश्याम देवकिसनजी चांडक**
संस्थापक – अध्यक्ष



**सौ. कोमलताई झंवर**
अध्यक्षा



**श्री. राजेश देशलहरा**
उपाध्यक्ष



**डॉ. श्री. सुकेश झंवर**
चिफ मॅनेजिंग डायरेक्टर




**डॉ. श्री. किशोर केला**
संचालक



**श्री. अंबेश बियाणी**
संचालक



**श्री. अजय सेंगर**
संचालक



**श्री.नंदकिशोर झंवर**
संचालक



**श्री.नंदकिशोर बाहेती**
संचालक



**श्री. किशोर महाजन**
संचालक



**श्री. विनोद केडिया**
संचालक




**डॉ.श्री. विनोद भंडारी**
संचालक



**श्री.सुबोध काकाणी**
संचालक




**श्री.दिनेश गांधी**
संचालक



**श्री.राजेश लड्ढा**
सरव्यवस्थापक



**श्री. गोपाल चिरानिया**
संचालक



**श्री. शिरीष देशपांडे**
मुख्य कार्यकारी अधिकारी
पुणे विभाग

**Buldana Urban**
Co-op. Credit Society Ltd., Buldana

**बुलडाणा अर्बन**
को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., बुलडाणा

रजि.नं. २६७ (Multistate)

ISO-900:2000 SA-8000-2001 **प्रमाणित**

# आदरांजली

या आर्थिक वर्षामध्ये राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या
सामाजिक, राजकीय क्षेत्रातील महनीय व्यक्ती, शास्त्रज्ञ, सैन्य व पोलीस दलातील जवान
त्याचप्रमाणे संस्थेचे सभासद, त्यांचे कुटूंबीय, आप्त मृत्यू पावले आहेत.....
त्या सर्वांच्या आत्म्यास मुक्ती मिळो ही प्रार्थना !



We sincerely pay our homage to
those nationally and internationally
famous personalities who worked in the field of
Social Work, Science, Politics, Defence, Police Force…
Members of the Society, their family members, relatives…
... who have passed on into the bright light.

**– बुलडाणा अर्बन परिवार –**

**बँकर्स :–**
- बँक ऑफ इंडिया, क्षेत्रीय कार्यालय नागपूर
- इंडियन ओव्हरसीज बँक
- युनियन बँक ऑफ इंडिया
- यस बँक, मुंबई
- कॉर्पोरेशन बँक
- आय सी आय सी आय
- ॲक्सिस बँक

**वैधानिक लेखापरीक्षक**
- मे. राजंदेकर ॲन्ड असोशिएट्स
  चार्टर्ड अकाऊंटंट, नागपूर
- मे. अभय गुंदेचा ॲन्ड कंपनी
  चार्टर्ड अकाऊंटंट, पुणे
- **आर्बिट्रेटर**
  श्री. सतिष भुतडा
  मा. सेंट्रल रजिष्ट्रार दिल्ली
  यांनी नियुक्त केलेले

**सल्लागार**
- श्री. रवीन्द्र खापरे,ॲडव्होकेट,हायकोर्ट, नागपूर
- श्री. सचिन वैद्य, चार्टर्ड अकाऊंटंट, बुलडाणा
- श्री. जितेंद्र कोठारी, ॲडव्होकेट, बुलडाणा
- श्री. विनोद गांधी, चार्टर्ड अकाऊंटंट, नागपूर
- श्री. विशाल तोतला, चार्टर्ड अकाऊंटंट,जळगांव
- श्री. उमेश झंवर, चार्टर्ड अकाऊंटंट, जालना



**राधेश्याम चांडक**
संस्थापक अध्यक्ष

## मनोगत

## धन्य भाग सेवा का अवसर पायो....

माझ्या प्रिय सभासद बंधू-भगिनींनो !

खरंच वाटलंही नव्हतं की आपण येथवर मजल गाठू... हे सगळं शक्य झालं ते आपल्या असण्यामुळे आपल्या समर्थ अशा साथीमुळे आज बुलडाणा अर्बन सोसायटी ही पतसंस्थांच्या विश्वात एका तेजाने झळकत आहे आणि याची सोनेरी किनार आपण आहात, माझे सभासद आहेत. आपल्या सर्वांचा मी कायम ऋणी आहे आणि ऋणातच राहू इच्छितो. ते यासाठी की, याच माध्यमातून अनेक क्षेत्रात सेवेची संधी मिळत आहे हे माझे भाग्य आहे. याचा मलाही कधी कधी स्वतःचाच हेवा वाटतो. जे प्रेम आणि विश्वास मला मिळाला याची उतराई होणे शक्य नाही.

आजचा हा ३२ वा वार्षिक अहवाल. तीन दशक पूर्ण करुन वर दोन वर्ष उलटली. ग्राहक हित आणि सेवा हाच कायम प्राधान्यक्रम राहिल्याने ही उन्नती साधली. केवळ १२ हजाराचे भागभांडवल आणि ७२ सभासद हा होता पाया रचतानाच आकडा आणि आज या छोट्याशा रोपट्याचा एक वटवृक्ष झालाय.. ज्याच्या सावलीत अगणीत पांथस्थ येतात आणि सावली मिळते. ही सावली का निर्माण झाली तर आपण सगळ्यांनी त्यावेळी रोपट्याचे योग्य सिंचन केले. पुरेशी काळजी घेतली आणि आपल्या स्वप्नांवर काजळी जमा होऊ दिली नाही म्हणूनच.

आज हा वटवृक्ष किती विस्तारलाय हे नव्याने काय सांगणार, पण एवढंच म्हणेन की, केवळ अर्थकारण न बघता समाजातील इतर अंगांचाही विचार आपण केला आणि यातून खऱ्या अर्थाने समाजकाराणाला चालना देऊ केली. आज संस्थेच्या ४२६ शाखा आणि २९१ गोदामे आहे. ऑनलाईन

सेवा दहा हजार कोटी रुपयांवर गेली आहे, या यशात सर्व सभासद आणि संचालकांचा सिंहाचा वाटा आहे.

सातत्याने नवनविन उपक्रमांचा ध्यास, ज्यातून सभासदांनी त्याच्या कुटूंबियांनी प्रगती व्हावी, अर्थिक बाजू भक्कम करण्यासोबतच त्यांना समाजिक दृष्ट्याही एक सक्षम कुटूंब म्हणून लाभ व्हावा यातून अनेक उपक्रमांनी जन्म घेतला, अनेक सेवा सुरु झाल्या. संस्थेने आपल्या आर्थिक स्त्रोताचा काही ठराविक भाग समाजाला या माध्यमातून पुन्हा देण्याचा प्रयत्न केला. प्रारंभीपासून व्यवहाराला सामाजिक बांधिलकीची जोड दिली. यामुळे भारतात नावलौकिक मिळाले. याची दखल समाजाने घेतली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने आपल्या साठाव्या वर्धापनदिनी बुलडाणा अर्बनच्या यशस्वी आणि चौफेर कामगिरीची दखल घेत मला संस्थापक अध्यक्ष या नात्याने 'जीवन गौरव पुरस्कार २०१८' ने सन्मानित केले. हा सन्मान माझा नाही तर आपल्या सगळ्यांच्या विश्वासाचा आणि परिश्रमाचा आहे असे मी मानतो. विधानसभा अध्यक्ष मा. ना. हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. ही संस्थेने ३२ वर्षे केलेल्या कामांची पावतीच आहे.

बुलडाणा जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या तसेच समाजातील गरिब कुटूंबातील मुला-मुलींचे बिकट आर्थिक परिस्थितीमुळे रखडलेले विवाह आयोजित करण्यासाठी धर्मादाय आयुक्त मा.श्री. अजयजी राजंदेकर यांनी केलेल्या आवाहनाला सर्व धर्मिय १०१ जोडप्यांना त्यांच्या धर्माप्रमाणे विधीवत विवाहबध्द करण्यात आले. हा उपक्रम नित्य करण्याचा मानस आहे.

संस्थेच्या दादर शाखेचा मोठ्या थाटात शुभारंभ नुकताच झाला या शाखेच्या ठिकाणी संस्थेने भारतातील पहिली रोबोटिक लॉकर्स सुविधा व डॉक्युमेंटरी बँक या नाविन्यपूर्ण उपक्रमांना सुरुवात केली. याचा शुभारंभ केंद्रीय रस्ते व जलवाहतूक मंत्री भारत सरकार मा.ना.श्री. नितीनजी गडकरी, महाराष्ट्र राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री मा.ना.श्री. गिरीषजी बापट, महाराष्ट्र राज्य विधान परिषद अध्यक्ष मा.ना.श्री. रामराजे निंबाळकर या मान्यवरांच्या उपस्थितीत झाला. या कार्यक्रमात मान्यवरांनी संस्थेच्या विविध उपक्रमांचे कौतुक केले व सहकाराच्या माध्यमातून काय होऊ शकते याचे उत्तम उदाहरण म्हणजे बुलडाणा अर्बन आहे असा आवर्जून उल्लेख केला. ही आपल्या सर्वांसाठीच गौरवाची बाब आहे.

संस्थेची वाटचाल ही कायम शेतकरी वर्गाला केंद्रीत करुन झाली, बहुतांशी उपक्रम हे शेतकरी आणि ग्रामीण भारत यादृष्टीने आकाराला आले. यात गोदामे असो वा कापड निर्मिती. संस्थेने शेतकरी सभासदांसाठी ग्रामीण गोदाम योजना सुरु केली आणि त्याचा मोठा लाभ या वर्गाला झाला. आजमितीला २९१ गोदामे संस्थेकडे आहेत पैकी १७१ संस्थेच्या मालकीची आहेत. गोदामाचे क्षेत्रफळ २५५१३९५ चौरस फुट आहे. तर माल साठवणूक क्षमता ३८२५७०० क्विंटल इतकी आहे. बाजारपेठेत येणाऱ्या तेजी मंदीचा लाभ शेतकरी वर्गाने त्यांचा माल गोदामात साठविल्यामुळे मिळत आहे. बाजार मुल्ल्यानुसार ते विक्रीचा निर्णय घेत असल्याने भक्कम आर्थिक बळ त्यांच्या मागे उभे राहात आहे. संस्था कायमच शेतकरी सभासद हित लक्षात घेऊन विविध योजना राबवत असते, म्हणून शेतकरी सभासदांसाठी चिखली येथे ७००० मेट्रीक टन क्षमतेचे कोल्ड स्टोअरेज उभारले आहे. याची मागणी आता वाढत असूनच लवकरच आपल्याला जालना, वर्धा, मलकापूर येथेही या प्रकारची सुविधा उभी झालेली दिसेल. येत्या आर्थिक वर्षात आणखी ५० गोदामे उभारण्याचा मानस आहे.

शेतकऱ्यांचा मालाला हमी भाव मिळावा म्हणून राज्य शासन नाविण्यपूर्ण उपक्रम सुरु करत आहे. खाजगी क्षेत्रातील संस्था शेतकऱ्यांचा माल खरेदी करु शकतील अशी ही योजना आहे. यासाठी आवश्यक मुलभत सुविधा फक्त आपल्या संस्थेकडेच आहे. या योजनेमध्ये थेट शेतकऱ्यांकडून हमी भावात माल खरेदी करता येणार आहे. या योजनेचा लाभ आपल्या सर्वच शेतकरी सभासदांना मिळावा यादृष्टीने संचालक मंडळ सकारात्मक विचार करत असून शासनासोबत सदर उपक्रमात थेट सहभाग घेणार आहे.

सामाजिक बांधिलकी जपताना हिंदू संस्कृती जपण्यासाठी संस्थेचा नियमित प्रयत्न आहे. यासाठी कर्मचारी गणेशोत्सव, नवरात्रात गरबा उत्सव याचे दरवर्षी आयोजन केले जाते. सद्‌भावना समितीच्या माध्यमातून भागवत कथा, रामकथा यांचे आयोजन करण्यात येते. हिंदू संस्कृतीचा आधार असलेल्या चारही वेदांचे अध्ययन व्हावे हा दृष्टीकोन बाळगत संस्थेने बुलडाणा येथे वेद विद्यालय सुरु केले आहे. आचार्य स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज यांच्या हस्ते वेद विद्यालय वास्तुचा शुभारंभ करण्यात आला. यावर्षी ३० विद्यार्थ्यांनी वेद विद्यालयात प्रवेश घेतला

आहे. याच ठिकाणी संस्थेच्या ज्येष्ठ सभासदांसाठी स्वर्गाश्रम सुरु करण्यात येणार आहे.

चालू आर्थिक वर्षात तिरुपती येथे स्वमालकीच्या चौथ्या भक्तनिवासाचा लोकार्पण सोहळा पार पडला, तसेच शिर्डी येथेही साई भक्तांसाठी स्वमालकीचे भक्त निवास सुरु केले आहे. याचा लाभ दरवर्षी हजारो भाविक घेत असतात.

स्थापनेपासून बुलडाणा अर्बन ग्राहक सभासदांना चांगली दर्जेदार सेवा पुरविण्याचा प्रयत्न करत आहे. हाच ध्यास बाळगत कामकाज सुरु आहे. कठीण परिश्रमानंतर आज संस्थेला हे रुप प्राप्त झाले आहे. संस्थेच्या आर्थिक प्रगतीचा आलेख उत्तुंग झाला तरी संस्था आपल्या मुळ उद्दीष्टापासून जराही ढळली नाही. आर्थिक क्षेत्रातील माध्यमातून अनेक गरजूंना आर्थिक पतपुरवठा केला आहे. यामध्ये शेतकरी, व्यावसायिक, नोकरदार बचत गट यांचा समावेश आहे. वेअर हाऊसच्या माध्यमातून वेअर हाऊस तारण कर्ज, सोने तारण कर्ज वितरीत केले आहे. सभासदांच्या आर्थिक गरजा पूर्ण होत असताना पुढे जाऊन आम्ही सोशल बँकींगची संकल्पना आणली. सहकाराच्या माध्यमातून समाजाच्या गरजा पूर्ण करुन सभासदाला चांगल्यात चांगली सेवा देण्याचा प्रमाणिक प्रयत्न बुलडाणा अर्बनच्या माध्यमातून करण्याचा आम्ही प्रयत्न करत आहोत.

या आर्थिक वर्षात केंद्रीय रस्ते व जलवाहतुक मंत्री भारत सरकार मा.ना.श्री. नितीनजी गडकरी, केंद्रीय गृहराज्य मंत्री मा.ना.श्री. हंसराजजी अहिर, महाराष्ट्र राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री मा.ना.श्री. गिरीषजी बापट, महाराष्ट्र राज्य विधान परिषद अध्यक्ष मा.ना.श्री. रामराजे निंबाळकर, माजी मंत्री आनंदरावजी अडसुळ, मा.श्री. चंदनसिंहजी चंदेल, अध्यक्ष वनविकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष मा.खा. रावसाहेब दानवे, महाराष्ट्राचे सहकार व पणन मंत्री मा.ना.श्री. सुभाषराव देशमुख, महाराष्ट्राचे शिक्षण मंत्री मा.ना.श्री. विनोदजी तावडे, जलसंपदा व वैद्यकिय शिक्षण मंत्री मा.ना.श्री. गिरीषभाऊ महाजन, पाणीपुरवठा मंत्री मा.ना.श्री. बबनराव लोणीकर, महाराष्ट्राचे गृहराज्य तथा नगर विकास राज्यमंत्री मा.ना. रणजीत पाटील, ऊर्जा व पर्यटन राज्यमंत्री मा.ना. मदनभाऊ येरावार, माजी मंत्री मा.श्री. डॉ. राजेंद्रजी शिंगणे, या मान्यवरांसह तिरुमला तिरुपती देवस्थानचे अध्यक्ष मा.श्री. छदलवाडा कृष्णमुर्ती यांची संस्थेच्या विविध कार्यक्रमाप्रसंगी उपस्थिती लाभली. या सर्व मान्यवरांचे मनापासून आभार !

केंद्र आणि राज्यातील सहकार आणि इतर विभागातील शासकीय अधिकारी आणि कर्मचारी यांच्या नियमित सहकार्यामुळे संस्थेच्या प्रगतीचा वेग कायम राहत आहे. या सर्वांचे आभार ! संस्थेचे ठेवीदार, कर्जदार, संचालक, स्थानिक सल्लागार समिती सदस्य, कर्मचारी, दैनंदिनी प्रतिनिधी, या सगळ्यांचे संस्थेवरील प्रेम असेच अबाधित राहावे आणि वृध्दींगत व्हावे ही अपेक्षा!

सर्व शाखांचे लेखापरिक्षण करणारे लेखापरिक्षक, विधिज्ञ, मुल्यांकनकर्ता यांचे आभार !

संस्थेच्या आर्थिक व्यवहाराला योग्य दिशा आणि बळ देणारे वैधानिक लेखापरिक्षक मे. राजंदेकर ॲन्ड असोशिएटस (नागपूर) आणि अभय गुंडेचा ॲन्ड कंपनी (पुणे) यांचे आभार !

आपल्या सर्वांचा लोभ आहेच, तो अधिक वृध्दींगत व्हावा ही प्रार्थना !

धन्यवाद !

स्नेहांकित

**राधेश्याम चांडक**
संस्थापक अध्यक्ष



**Radheshyam Chandak**
Founder Chairman

***Monologue***

***Blessed to have an opportunity to serve ....***

My Dear Member Brothers and Sisters !!

Really never had a thought that we could march up to here. It all could happen as you all being with. Because of your able team spirit, today the Buldana Urban Credit Society is shining like a glittering star in the world of credit societies and you are its golden reflecting edges. I am forever indebted to you all, and would like to be so. This is because through it I could always be in your service. Every breath of mine be for the progress of the Society. This is the only object and the endeavour. I am privileged for having an opportunity to serve through the Society. Sometimes I feel jealous of myself of it. It is simply not possible for me to discharge the bond of your love and affection.

This is the 32nd Annual Report. Two years have passed after completing three decades. This could be achieved only through the continued customer interest and service being at the top most preference. At the foundation, it was a just a tender plant, a capital of rupees twelve thousand only and 72 members, today it has transformed into a large tree which shower a shadow and sigh of relief to innumerable travelers. This shadow is there because all of us watered the tender plant properly, took its adequate care and did not let the soot of our dreams get accumulated.

It need not to tell how vast this tree has become now, but will only say that, we always had a thought of other social aspects and this in fact encouraged the work

of social service. Today the Society have 426 Branches and 291 go-downs. On-line services have gone up to Rs. 10,000/- crore. All Members and Directors have lion's share in this achievement.

There have been our continual persistence of new ventures aimed at comprehensive progress of members, to make them and their family financially and socially sound. Many of our activities have originated from this insight. Several services have begun. The Society has endeavoured to repay certain portion of its financial sources to the society at large through such medium. From the beginning, the business was well tied with a knot to social commitment. This has got recognition all over India. The society has taken a note of it. Taking a note of our successful and wide spread performance, Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, on the eve of its 60th Anniversary, felicitated me with Life Time Achievement Award. I believe, this honour is of your trust and efforts and not mine. This Award was given by the Shri Haribhau Bagade, Hon'ble Speaker of the Legislative Assembly. This is but a token of appreciation of our work in 32 years.

Responding to the Appeal made by the Hon'ble State Charity Commissioner, Shri Ajayji Rajandekar, 101 couples from all the religions from the Buldhana District, belonging to suicide-ridden farmer families and also to poor families, whose marriage were delayed owing to stringent financial conditions, have been married as per their individual religious rites and rituals. It is intended to continue this project in future.

Recently Dadar Branch of the Society was inaugurated in a grand gala function where innovative projects, Robotic Lockers and Documentary Bank, first in India have been started. The inauguration ceremony was performed in the auspicious presence of dignitaries Hon'ble Shri. Nitinji Gadkari - Union Minister of Road Transport, Shri Girishji Bapat - Food and Civil Supplies Minister, Maharashtra State, Shri Ramraje Nimbalkar, Speaker of the Maharashtra Legislative Council. In this programme, the dignitaries appreciated the various activities of the Society and described our Society as an example illustrating what can be done through the medium of co-operation. This is a thing of pride for all of us.

The journey of the Society has always been with farmers at its focal point. Most of the activities came in the form most suitable and convenient to farmers and rural inhabitants of the country. Be it go-downs or textiles. The Society has started a go-down scheme for the member-farmers and it has been availed to the great extent. Today there are 291 go-downs with the Society, out of which 271 are owned by the Society. The area of the go-downs is 2551395 sq. ft and goods storage capacity is 3825700 quintal. As the farmers have stored their goods in the go-down, they are availing advantages of up-downs in the market. They are taking the decision to sell as per the market value, so the farmers have strong financial back up. The Society is continuously implementing its schemes keeping in the sight the benefits to the member-farmers. Therefore, the Society has installed a cold-storage of 7000 MT at Chikhli for its member-farmers. There has been increase in its demands and therefore we have to raise such facility shortly at Jalna, Wardha, Malkapur. It is our intention to construct 50 more such go-downs in the coming financial year.

The State Government is launching innovative schemes in order to get assured price to the goods of the farmers. This is a scheme that private societies can purchase the goods of the farmers, and only our Society is having the required infrastructure amenities required for this. In this scheme, goods can be purchased directly from the farmers at the assured price. In order to get the benefit of this scheme to all our member-farmers, the Board of Directors is thinking positive and it will be directly involved in the said scheme along with the Government.

While maintaining social commitment, it is regular endeavour of the Society to protect Hindu culture. For this, employees' Ganeshotstav, Garba in Navratree is organized every year. Through the Sadbhavana Samiti, programmes like Bhagwat Katha. Ram Katha are organized. A

Vedic School has been started at Buldana to facilitate the promotion of study of all four Vedas, which are the visionary approach of the Hindu culture. The Vedic School building was inaugurated by Acharya Swami Govind Giriji Maharaj. This year, 30 students have enrolled in Ved Vidyalaya. At this place, Swarg Ashram will be started for the senior members of the Society. In the current financial year, opening ceremony of the Society-owned fourth Bhakt Niwas at Tirupati was performed. Similarly Society-owned Bhakt Niwas for Sai Bhaktas has been started at Shirdi. Thousands of devotees are taking benefits of it every year.

Since its inception, the Buldana Urban is striving to provide quality services to its members. Work is on with this determination. Today's Society is the result of its long and severe hard work. The Society is not deviated even by an inch from its basic objectives, though the graph of its economic progress is rising to sky. Through financial sector, financial credit has been provided to many needy people. This includes farmers, businessmen, servicemen, Bachat Gat. Through Warehouse, have distributed warehouse mortgage debt, gold loan. While we could meet the financial needs of the members, we introduced the concept of social banking. We are making efforts to provide the best service to the members by meeting the needs of the society through co-operatives through Buldana Urban.

In the current financial year, we were fortunate enough to have the presence of eminent dignitaries like Hon'ble Shri Nitinji Gadkari - Union Minister for Road Transport and Highways, Hon'ble Shri Hansrajji Ahir – Minister of State, Home Affairs, Hon'ble Shri Girishji Bapat – Minister for Food and Civil Supplies, Maharashtra State, Hon'ble Shri Ramraje Nimbalkar – Speaker of the Maharashtra Legislative Council, Shri Anandraoji Adsul, Former Minister, Maharashtra State, Shri Chandansinhji Chandel – Chairman, Forest Development Corporation, Maharashtra State, Hon'ble Shri Raosaheb Danve – Maharashtra President of Bhartiya Janata Party, Hon'ble Shri Subhashrao Deshmukh – Minister for Sahakar, Panan & Vastrodyog, Maharashtra State, Hon'ble Shri Vinodraoji Tawade – Minister for Higher & Technical Education, Maharashtra State, Hon'ble Shri Girishbhau Bapat – Minister for Water Resources and Medical Education, Maharashtra State, Hon'ble Shri Babanrao Lonikar – Minister of Water Supply, Maharashtra State, Hon'ble Shri Ranjit Patil – Minister of State Home Urban Development, Maharashtra State, Hon'ble Shri Madanbhau Yerawar – Minister of State for Energy and Tourism, Maharashtra State, Former Minister Dr. Rajendraji Shingne, including the newly elected Chief of Tirumala Devsthan, Shri Chaldalwada Krishnamurthy, on various occasions. Heartfelt thanks to all the dignitaries.

Due to regular co-operation of Govt. officials and employees in the Central and State Co-op. and other Departments, the Society has maintained its pace of progress. Thanks to all. Expect the love of depositors, borrowers, Directors, Local advisory committee members, employees, daily representatives to the Society will continue and increase manifold bounds in the years to come.

Thanks to all Auditors, Advocates and Valuers.

Thanks to M/s Rajandekar & Associates, Nagpur and Abhay Gundecha & Co. Pune for guiding the Society in proper direction in its financial transaction.

We have your affection and love … we pray to grow it further.

Yours affectionate

**Radhyeshyam Chandak**
Founder Chairman



**डॉ. सुकेश झंवर**
चिफ मॅनेजिंग डायरेक्टर

## मनोगत
## हौसला अभी बाकी है.... उडान जारी रहेगा !

बंधू भगिनींनो !

एका ध्येयपूर्ण वाटचालीचे आपण सारेच साक्षीदार... आज खरा आपल्यासाठी अभिमानाचा आणि आनंदोत्सव साजरा करण्याचा दिवस ! आदरणीय भाईजींच्या कुशल मार्गदर्शनाखाली आपली वाटचाल दमदारपणे सुरु आहे आणि सुरु राहील यात शंका नाही. आज घडीला बुलडाणा अर्बन पतसंस्थेच्या ठेवींची रक्कम ६००० कोटी रुपयांवर गेली आहे. आणि रु. ६००० कोटींच्या ठेवी असणारी ही भारतातील एकमेव पतसंस्था आहे.

आपण ज्या पध्दतीने वाटचाल करतोय त्यात सगळ्यात महत्वाचे म्हणजे काळाच्या सोबतच नव्हे तर काही बाबतीत काळाच्याही पुढे विचार करुन पाऊले टाकली जात आहेत. यामुळे वेग आहे. प्रगती आहे.. अर्थकारणाला गती आहे ! पण या सगळ्यात तुमचा सक्रीय सहभाग हे यशाचे खरे गमक आहे. हेच बलस्थान आहे.

गेल्यावर्षी आर्थिक मंदीचा प्रतिकुल परिणाम आपल्याही व्यवहारांवर झाला होता, मात्र त्यानंतर चालू आर्थिक वर्षात वेग वाढवत आपण सहा हजार कोटींपर्यंत पोहोचलो. गतवर्षी केवळ रु. २८७ कोटी एवढीच वाढ ठेवींमध्ये झाली होती. मार्च २०१८ ते सप्टेंबर २०१८ या कालावधीत ठेवी रु. ६०० कोटींनी वाढल्या.. हा आहे आपण कमावलेला विश्वास आणि सचोटीची प्रचिती.

आज शाखांची संख्या ४२६ वर गेली असून सभासद संख्या १० लाखावर आहे. कोअर बँकींगच्या माध्यमातून ४१० शाखा जोडल्या गेल्या आहेत. सभासदांसाठी आरटीजीएस आणि एनईएफटी सारख्या सुविधा सुरु झाल्या आहेत. १५००० सभासद आज ऑनलाईन व्यवहार करत आहेत, यातून संगणक साक्षरता आणि डिजीटल व्यवहारांना मिळालेली चालना राष्ट्राच्या डिजीटल इंडिया संकल्पनेला पुढे नेणारी आहे. लवकरच आपण आयसीआयसीआय बँकेशी करार करणार असुन यामुळे सर्वच ऑनलाईन बँकींग, मोबाईल बँकींग आणि नेट बँकींग सारख्या सेवा सुरु होतील.

आज ग्रामीण भागात आपण पतसंस्थेचे घट्ट जाळे विणत, ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षमीकरणात खारीचा वाटा उचलत आहोत हे आवर्जुन नमुद करावेसे वाटते. ग्रामीण सदस्यांच्या केवळ आर्थिक गरजाच नाही तर त्यांच्या सामाजिक गरजांच्या पूर्तीसाठीही आपण काम करत आहोत. सामाजिक उपक्रमांतर्गत त्यांना विविध सोयी उपलब्ध करुन देणे, तसेच ग्रामीण भागात संस्थेच्या शाखेमार्फत ग्रामसभांचे आयोजन करण्यात येत असून सभासदांना संस्थेच्या सर्व योजनांची माहिती देण्यात येत आहे. गेल्या तीन महिन्यापासून हा उपक्रम राबविण्यात येत असून आतापर्यंत ४५० गावांमधून ग्रामसभांचे आयोजन केले आहे.

महत्वाचे म्हणजे आपण सुरु केलेल्या उपक्रमापैकी शेतकरी बांधवांसाठी जो जोड धंदा उपक्रम सुरु केला त्याचा लाभ अनेकांना झाला, होतोय. याद्वारे अमर डेअरी, बोदवड यांच्याशी करार करुन शेतकरी बांधवांना गायी–म्हशीचे कर्ज रुपाने वाटप केले असून दररोज १५०० लिटर दूध संकलन केले जाते. हा प्रकल्प डोंगरखंडाळा इथे राबविण्यात येत आहे. लवकरच अन्य भागातही याचप्रकारे शेतकरी बांधवांना साहाय्य उपलब्ध करुन देण्यात येईल. असाच एक नाविण्यपूर्ण उपक्रम आपण सुरु केला तो म्हणजे शेतकरी सभासदांसाठी माती परिक्षण ही योजना सुरु केली. संस्थेच्या प्रत्येक शाखेच्या ठिकाणी शेतकरी सभासदांसाठी अत्यल्प दरात माती परिक्षण करुन देण्यात येते. याच लाभ आज हजारो शेतकरी मित्र घेत आहेत.

याशिवाय आपल्या सबसिडरी असलेली कंपनी बुलडाणा अर्बन क्रेडीट केअरच्या माध्यमातून मायक्रोस्पिनींग मिल सुरु केली आहे. ग्रामीण भागातील शेतकरी वर्गाच्या कापसापासून त्याठिकाणी कापड तयार करण्याचा हा पहिला प्रकल्प आहे. आता येथे या कापडापासून शर्ट तयार करुन थेट ग्राहक व सभासदांसाठी उपलब्ध आहेत.

संस्थेने सभासदांच्या पाल्यासाठी सहकार विद्या मंदिर सुरु केले आहे. यामाध्यमातून सभासदांच्या पाल्यांना शिक्षणासाठी राजस्थानातील कोटा येथील दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी यशस्वी प्रयत्न केले. कोटा येथील संस्थेशी करार करुन बुलडाण्यातच कोटा यांचे मोशन क्लासेस सुरु केले. अगदी अल्पवेळेत आणि आयत्यावेळी क्लासेस सुरु करुन देखील आजमितीला ४०० विद्यार्थी येथे शिक्षण घेत आहेत. पुढील वर्षी हा आकडा ६०० पर्यंत जाईल हा विश्वास आहे. ज्या सभासदांच्या पाल्याला आर्थिक स्थितीमुळे कोटा येथे शिक्षणासाठी जाता येत नाही त्यांना संस्थेचा हा उपक्रम खूपच लाभदायी ठरतोय.

संस्थेने सामाजिक उपक्रमांतर्गत बुलडाणा जिल्ह्यातील आत्महत्या केलेल्या १६० शेतकरी कुटूंबातील २९८ विद्यार्थ्यांची शिक्षणाची जबाबदारी घेतली असून या विद्यार्थ्यांना शालेय साहित्य खरेदीसाठी ५ लाख ३४ हजार ४३० रुपयांची आर्थिक मदत केली आहे.

संस्थेने महाराष्ट्रातील पहिला आर ओ वॉटर एटीएम डोंगरखंडाळा येथे सुरु केला. गावकऱ्यांना यामुळे अवघ्या ३० पैसे लिटर दरात शुध्द पिण्याचे पाणी मिळते. याचप्रमाणे संस्थेने ३३ शाखांच्या ठिकाणी शुध्द पाण्याचे वॉटर एटीएम सुरु केले आहे. यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांचे आरोग्य अबाधित राहून पाण्याच्या आजारांवर नियंत्रण देखील आले आहे. अजून ३० ठिकाणी या पध्दतीचे वॉटर एटीएम लावण्याचा मानस आहे. राज्य शासनाच्या दोन कोटी वृक्ष लागवडीच्या उपक्रमात संस्थेने सक्रीय सहभाग नोंदविला. संस्थेच्या सर्व शाखा, गोदाम आणि सहकार

विद्या मंदिराच्या शाळा परिसरात २५ हजार वृक्ष लागवड आपण केली. संस्थेने वनविभागाशी करार करत बुलडाण्याजवळील खडकी गाव येथे वनविभागाची ५० एकर जमीन वृक्ष लागवडीसाठी व संवर्धनासाठी घेतली आहे. हे काम मोठ्या प्रमाणावर सुरु आहे.

स्वच्छ भारत अभियानांतर्गत सहभाग नोंदवण्यासाठी संस्थेने देऊळगांव राजा नगर परिषदेशी करार केला, याद्वारे स्वच्छता अभियान राबविले जाते. सदर अभियान संस्थेची सहयोगी संस्था बुलडाणा अर्बन सेफ्टी ॲन्ड सेक्युरिटी यांच्या माध्यमातून हाती घेण्यात आले आहे.

सभासदांसाठी संस्थेच्या सर्व शाखांवर विद्युत बिले स्विकारणाची सुविधा सुरु केली आहे. यासाठी महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनीबरोबर करार केला आहे.

राज्यातील सर्व पतसंस्थेसाठी कर्मचारी प्रशिक्षण केंद्र सुरु आहे, यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन यांच्याशी करार करुन संस्थेच्या शिर्डी येथील प्रशिक्षण केंद्राची इमारत नाममात्र भाडेतत्वावर दिली. २३ सप्टेंबर २०१७ पासुन प्रशिक्षण केंद्र सहकार संस्थांच्या प्रशिक्षणासाठी उपलब्ध केले आहे.

संस्थेने बुलडाणा येथे डिजीटल शॉपी सुरु केली असून या ठिकाणी संस्थेची सबसिडरी कंपनी बुलडाणा अर्बन क्रेडीट केअर यांनी तयार केलेल्या वस्तु ज्यात शर्ट, शाम्पू, हँडवॉश, फेसवॉश, इलेक्ट्रीक व्हेइकल्स, बचत गटांची निर्मिती असलेले खाद्यपदार्थ सर्वच प्रकारच्या ग्राहकांना उपलब्ध करुन दिली आहेत.

देशविदेशातील माहिती आणि अनुभवांच्या आधारेच मानवी जीवन समृध्द होत जाते. याचा प्रत्यय आपल्याला येत आहे. यामुळेच आपण संस्था सभासदांसाठी देशातच नाही तर परदेशातही सहलींचे आयोजन करत असतो. यात केवळ पर्यटन हा उद्देश नाही तर यातून त्या स्थळांचा अभ्यासही होतो. या अनुषंगाने ज्ञानगंगा अभयारण्यात बोथा जंगल सफारीचे आयोजन संस्थेतर्फे केले जाते. यावर्षी जवळपास १००० पर्यटकांनी याचा लाभ घेतला. गेल्या महिन्यात म्हणजे ऑगस्ट २०१८ मध्ये संस्थेच्या सभासदांसाठी श्रीलंका येथे रामायण सहलीचे आयोजन केले गेले. यामध्ये ४०० सभासदांनी सहलीचा लाभ घेतला.

गेल्या आर्थिक वर्षात महाराष्ट्रासह मध्यप्रदेश, गुजरात, कर्नाटक, ओरिसा, तसेच नेपाळ, भुतान, थायलंड, फिलीपाइन्स, श्रीलंका, मंगोलिया व चीन, सिंगापूर, कोरिया या देशांमधील विविध क्रेडीट युनियनच्या प्रतिनिधींनी संस्थेला भेटी देऊन संस्थेची माहिती जाणून घेतली. आता विविध सहकारी युनियनचे प्रतिनिधी संस्थेला भेटी देत आहेत.

एकूणच संस्थेचा विस्तार हा आकाशाला गवसणी घालणारा आहे. आपली संस्था आंतरराष्ट्रीय पातळीवर आपलं अस्तित्व दाखवू पहात आहे. आदरणीय भाईजी यांचे मौलिक मार्गदर्शन आणि आपल्या सहकार्याने आपण आणखी पुढे जाऊ. बस उडान का हौसला अभी है....!

धन्यवाद !

आपला स्नेही

**डॉ. सुकेश झंवर**
चिफ मॅनेजिंग डायरेक्टर



**Dr. Sukesh Zamwar**
Chief Managing Director

***Monologue***

***Spirited Enough… To Aim High***

Sisters and Brothers,

We are witness to a spirited journey. Today is the day of proud and celebration for all of us! Our journey is going on well under the skillful guidance of Respected Bhaiji, and there is no doubt that, it will continue further. The country is still waiting for Acche Din. But you have had and showed Acche Din to our family members assembled here. Offered them opportunities. Today the amount of deposits in Buldhana Urban Credit Society has gone up to Rs. 6000 Crore and this is the only Credit Society having deposit of Rs. 6000 Crore.

The most important thing in the way we are treading is that we are moving not only with time, but sometimes steps are being taken to think ahead of time; so there is speed, there is progress. There is boost to economy. But your active participation in this is the true gimmick of success. This is the strength.

Last year, the adverse effects of the economic downturn were on our business too. However, we have reached 6000 crores in the current financial year. Last year, there was increase in the deposits by Rs. 287 crore only. The deposits have increased by 600 crore in March, 2018 to September, 2018. This is the perspective of earnest faith and integrity. Today the number of branches has gone up to 426 and the membership is more than 10 lakh. 410 Branches have been connected through core banking. For Members, facilities like RTGS and NEFT have been started. Currently 15000 members are conducting online transactions.

The result of this is that computer literacy and digital transactions are leading the nation's digital Indian concept. Soon we will be entering into an agreement with ICICI Bank, so that all the services like online banking, mobile banking and net banking can be started.

Today I want to emphasize upon that we are doing a little bit but a distinguished work of weaving a strong knot of credit societies in the rural area. We are working not only to meet the financial needs of rural members but also trying to fulfil their social needs. Gram Sabhas are being organized to provide various facilities to them under social programmes, and the members are being given information of all the plans of the Society through its Branches there. This program is being implemented since last three months and so far 450 villages have organized Gramsabhas.

Most importantly, of the different programmes, many have been and are being benefited by the program that we initiated for the farmers. Through this, we have entered into agreements with Amar Dairy, Bodwad and distributed loan to farmers for purchasing cows-buffloes and about 1500 liters of milk is being collected daily. This project is being implemented at Dongarkhandala. Shortly such facility will be made available to farmers from other regions. We have undertaken one such innovative programmes - "Soil Testing Scheme" for farmers. At every Branch of the Society, soil testing is done for farmer members at nominal charge. Today thousands of farmers are taking advantage of this.

Apart from this, we have started micro spinning mill through our subsidiary company Buldana Urban Credit Care. Soon the work of textile will be complete. This is the first ever project of manufacturing clothes from the cotton produced by the farmers in the rural area. Now the shirts from this cloth are available directly to the customers and members.

The Society has started Sahakar Vidya Mandir for the wards of its members. Through this, attempts have been made for imparting quality education from well-known educational institute of Kota, Rajasthan. Agreement has been signed with the Kota Institute and thereby its Motion Classes started at Buldhana itself. Though the classes were launched in short time and instantly, today about 400 students are taking education there and I believe this number of student will touch to 600 in the next year. This project is beneficial to the wards of those members who cannot afford to go to Kota, Rajasthan for education.

The Society has taken responsibility for education of 298 students of 160 farmers, who committed suicide in the Buldhana District, under the Corporate Social Responsibility, and provided financial assistance of Rs. 5 Lakh 34 Thousand 430 for the purchase of school stationary to the students.

The Society has started first ever R.O Water A.T.M at Dongarkhandala. With this, the villagers are getting pure drinking water at nominal rate of 30 paisa per liter. Like this the Society has started pure drinking water A.T.M at its 33 Branches. This has resulted in wellness of health in rural inhabitants and also control over the diseases caused by unhygienic water. It is intended to install such water ATMs at 20 more places. The Society has actively participated in the State Government's programmes of cultivating 2 crore plants. We have cultivated 25,000 plants in the vicinity of our different Branches, go-downs and Sahakar Vidya Mandirs. The Society has entered into an agreement with the Forest Department and has taken 50 acre land at village Khadaki, near Buldana, for plantation and conservation of trees. This work in going on on large scale.

The Society has entered into an agreement with the Deulgaon Raja Municipal Council to register its participation in the Clean India Movement, thereby cleanliness campaign is implemented. Presently this campaign is undertaken through a subsidiary Society, Buldana Urban Safety and Security.

For members of the Society, a facility of accepting electricity bills has been started at all the Branches and for this an agreement has been entered into with the Maharashtra Electricity Distribution Company.

Employees Training Center has been started for all the credit societies in the State. For this with an agreement with the Maharashtra State Co-operative Credit Society Federation, the building of the training center at Shirdi of the Society was given on rent basis at a very nominal rent. The training center has been made available for the training with effect from 23rd September, 2017.

The Society has started Digital Shoppee at Buldana where the goods prepared by the subsidiary Society which includes Shirts, Shampoo, Handwash, Facewash, Electric Vehicles and also the food items made by the Bachat Gats (Saving Groups) are made available to the customers.

Our life gets enriched based on the information and experiences we get from within and foreign countries, and for this we are arranging trips for our members not only within our country but also to foreign countries. Tourism is not the only object behind this, but with such trips those places are studied. In this reference, the Society plans trips to Botha Forest Sanctuary and about 1000 tourists have availed this facility. In the last month i.e. in August, 2018, Ramayana Trip to Sri Lanka was arranged in which was availed by 400 members.

In the preceding financial year, delegations of various Credit Unions from Madhya Pradesh, Gujarat, Karnatak, Orissa, including Maharashtra, and also from countries like Nepal, Bhutan, Thailand, Philippines, Sri Lanka, Magnolia, China, Singapore, Korea have visited and obtained information from the Society. Now, delegates of various Co-operative Unions are paying visits to the Society.

Overall, sky is the limit for development and expansion of the society. Our Society is all set to make feel its presence at the national level. We will march further under the able guidance of Respected Bhaiji and with co-operation of you all. *Spirited Enough to Aim High ... !*

Thanks !

Yours affectionately,

**Dr. Sukesh Zamwar**
Chief Managing Director

## ✻ वार्षिक साधारण सभेची सुचना ✻

(फक्त सभासदांसाठी)

**रविवार, दि. ३० सप्टेंबर २०१८**

जा.क्र. :- ९४७/१८-१९ दिनांक : १५ सप्टेंबर २०१८

सन्माननीय सभासद,

बुलडाणा अर्बन को-ऑप. क्रेडीट सोसायटी म.बुलडाणा (मल्टीस्टेट) र.नं. २६७ या आपल्या संस्थेची वार्षिक साधारण सभा **रविवार, दिनांक ३० सप्टेंबर २०१८** रोजी 'सहकार विद्या मंदिर', चिखली रोड, बुलडाणा या ठिकाणी दुपारी ४.०० वाजता आयोजित केली आहे. या सभेस आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे.

**मा. संचालक मंडळाचे आदेशानुसार....**

**डॉ. सुकेश झंवर**
चिफ मॅनेजिंग डायरेक्टर

## ✻ सभेपुढील कामकाजाचे विषय ✻

१) मागील दिनांक १० सप्टेंबर २०१७ रोजीच्या वार्षिक साधारण सभेचे प्रतिवृत वाचून कायम करणे.
२) दिनांक ३१/०३/२०१८ अखेर सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षातील संस्थेच्या जमा-खर्च, नफा-तोटा व ताळेबंद पत्रकास मंजुरी देणे.
३) संचालक मंडळाची सभा दि. १४/०५/२०१८ ठराव क्र. १६ नुसार केलेल्या शिफारशीप्रमाणे सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षासाठीच्या अंदाज पत्रकास मंजुरी देणे.
४) संचालक मंडळाची सभा दि. १४/०५/२०१८ ठराव क्र. १७ नुसार केलेल्या शिफारशीप्रमाणे सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षाच्या मंजुर अंदाज पत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे.
५) संचालक मंडळाची सभा दि. १४/०५/२०१८ ठराव क्र. १८ नुसार केलेल्या शिफारशीप्रमाणे नफा विभागणीस मंजुरी देणे.
६) सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षाच्या अंकेक्षण अहवालास मंजुरी देणे व सन २०१६-२०१७ या अंकेक्षण अहवालाच्या दोष दुरुस्ती अहवालास मंजुरी देणे.
७) सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात कर्ज वसुली यासाठी विशेष कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रोत्साहनपर बक्षीस देणे, त्याचप्रमाणे नफ्यानुसार शाखांना प्रोत्साहनपर बक्षीस देणे बाबत.
८) सन २०१८-२०१९ या वर्षासाठी संस्थेची बाहेरील कर्जमर्यादा निश्चित करणेबाबत विचार करणे.
९) संस्थेचे संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईक यांचेकडील दि. ३१/०३/२०१८ अखेर येणे कर्जाचा अहवाल सादर करणे.
१०) दि मल्टीस्टेट को-ऑप. सोसायटीज ॲक्ट २००२ अन्वये सन २०१८-२०१९ या वर्षाकरीता लेखा परीक्षकांची नियुक्ती करणे व त्यांचा मेहनतनामा ठरविणे.
११) संस्थेच्या संचालक सदस्यांचे नातेवाईक असलेल्या कर्मचाऱ्यांची यादी प्रसिध्दी करणे.
१२) संस्थेचे उपविधि क्र. १ (iv) Area of Operation, संस्थेचे उपविधी क्र. ४ (ii) Membership मधे दुरुस्ती करणे.
१३) संस्थेची Subsidiary Company यांच्या सन २०१७-१८ च्या आर्थिक पत्रके व अंकेक्षण अहवालास मान्यता देणे.
१४) सन २०१७-२०१८ या आर्थिक वषात सभासदत्व रद्द झालेल्या सभासदांची यादी सादर करणे व त्यास मान्यता देणे.
१५) सभासदांनी सभेच्या तीन दिवस अगोदर लेखी स्वरुपात विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देणे.
१६) मा. अध्यक्षांचे परवानगीने वेळेवर येणारे विषय.

**टीप:- १) कोरम अभावी सभा तहकुब झाल्यास तीच सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल व वरील विषय चर्चिले जातील. २) सभेनंतर सर्व सभासदांच्या भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. ३) ज्या सभासदांना आपल्या सूचना मांडावयाच्या आहेत त्यांनी त्या सभेपूर्वी ३ दिवस लेखी स्वरुपामध्ये मुख्य कार्यालयामध्ये पाठवाव्यात. ४) संस्थेच्या उपविधीप्रमाणे जे सभासद सतत तीन वार्षिक साधारण सभांना गैरहजर राहतील त्यांचे सभासदत्व रद्द होवू शकते.**

Area of Operation:- Maharashtra, Madhya Pradesh, Chhattisgarh, Gujarat, Rajasthan, Andhra Pradesh, Goa, Andaman & Nikobar

## ✻Notice of the Annual General Meeting ✻

(Only for members)

Sunday 30th September 2018

Outward No. 947/18-19 Date : 15th Sept. 2018

All Hon. Members

The Annual General Meeting of Buldana Urban Co-Op. Credit Society Ltd. Buldana R.No. 267 Will be held on **Sunday 30th September 2018 at 4.00 p.m.** at Sahakar Vidya Mandir, Vidya Nagari, Chikhali Road, Buldana All Society Members are requested to attend the A.G.M. Meeting.

**By Order of Board of Directors**

**Dr. Sukesh Zamwar**
Chief Managing Director

## ✻ Subject to be transacted ✻

1) To read and confirm the minutes of previous AGM held on 10th September 2017.
2) To confirm and accept the Balance Sheet, Profit & Loss and Receipt & Payment for the year ended on 31.03.2018.
3) To consider the Budget for the year 2018-2019 as per the recommendation of Board of Directors' meeting Dt.14.05.2018 (Vide resolution No. 16).
4) To sanction excess expenses over the Budget for the year 2017-2018 as per the recommendation of Board of Directors' meeting Dt. 14-05-2018 (Vide resolution No. 17)
5) To confirm and accept the profit appropriation as per the recommendation of Board of Directors' meeting Dt. 14-05-2018 (Vide resolution No. 18)
6) To approve statutory Auditor's Report for the year 2017- 2018 and confirm Audit Compliance Report for the year 2016-2017.
7) To give the consolation prize to the staff members of the Society who have helped to increase the Recovery and Profit of the Society in the year 2017-2018, to give out prizes to the Branches in appreciation.
8) To sanction and fix the credit exposure limit for outside borrowing by the Society for the year 2018-19.
9) To produce detailed information of the outstanding loan to Directors and their relatives as on 31-03-2018.
10) To appoint Statutory Auditor for year 2018-2019 as per the Multi State Co-Op. Societies A ct. ,2002 and to decide upon their remuneration.
11) To declare list of employees who are the relatives of members of Board of Directors.
12) To amend the Bye Law of the Society No. 1 (iv) Area of Operation, Bye Law of the Society No. 4 (ii) Membership.
13) To Confirm and accept accounts & audit report of subsidiary company of the Society for the year 2017-18
14) To Provide the list of the members whose membership has been cancelled in the financial year 2017-2018
15) Discussion on queries from members received 3 days prior to the AGM
16) To consider any other matter with the permission of Hon. Chairperson

**Note : 1) If the Quorum is not fulfilled then the meeting will be adjourned for half on hour and such adjourned meeting will then be held at the same date at the same place which will not require the quorum. 2) Meeting will be followed by dinner. 3) Members are requested to give a 3 days' notice to the Head office in case they require any information from the society 4) Membership will be dissolved if a member remains absent for AGM Conse cutively for 3 yrs. as per Section 29 of Multi-State Co-op. Soc. Act. 2002.**

**Report on Other Legal and Regulatory Requirements**

1. Subject to our comments and observations contained in Audit Memorandum (Part A,B and C), we report that:

a) we have obtained all the information and explanations which to the best of our knowledge and belief were necessary for the purpose of our audit;

b) in our opinion proper books of account as required by The Multi State Co-operative Societies Rules, 2002 and bye-laws of the society, have been kept by the Society so far as appears from our examination of those books and proper returns adequate for the purpose of audit have been received from the branches not visited by us.

c) the transactions appearing to us to be contrary to The Multi State Co-operative Societies Act and Rules, 2002 and bye-laws of the society, monies of the society appearing to be bad and doubtful of recovery, loans given by the society to the members of the board are given at Appendix-I attached herewith and forming part of this audit report. As informed by the management of the society no matter has been exclusively specified by the Central Registrar in respect of the society for the year under audit.

d) the Balance Sheet and Statement of Profit and Loss dealt with by this Report are in agreement with the books of account.

e) On the basis of written representation received from the directors of the Society and taken on record by the Board of Directors, we report that none of the Directors is disqualified as on 31st March 2018 from being appointed as Director in terms of Clause of A sub-section 1 of Section 43 of the Multi-State Co-operative Societies Act, 2002.

f) In our opinion, the Balance Sheet and the Profit & Loss Account dealt with by this report comply with the Accounting Standards issued by the Institute of Chartered Accountants of India in so far as they apply to the Co-operative Society (Credit Div.) except the following:

Prior Period Items (AS5): There is no practice of disclosing prior period items separately in the Profit & Loss Account as required by Accounting Standard 5. Such amounts have been included in their natural heads of account and not separately disclosed in a manner that their impact on the financial results for the year can be perceived. The quantum is not ascertainable.

Employee Benefits (AS15): Separate disclosure of the employee benefits as laid down at the Accounting Standard (AS15) remains to be made in the financial statements.

Accounting for Taxes on Income (AS22): The deferred tax assets and deferred tax liabilities arising out of the timing difference remain to be recognised in the financial statements.

Financial Reporting Of Interest in Joint Venture (AS27): The disclosure requirements as laid down in the said standard remain to be adhered to, in totality.

In absence of adherence to the accounting standards mentioned above, its respective and total financial impact on the financial statements could not be perceived.

g) We further report that had the financial effect of Clause 1 and 17 of Appendix I forming part of this report been considered the Profit would have reduced by **Rs** 51944684.25**/-** with corresponding reduction in Reserve Funds.(calculation sheet enclosed).

**For**
**Rajandekar & Associates**
**Chartered Accounts**

**Place : Nagpur**
**Dated : 20/08/2018**

**(Rahul Kawale)**
**Partner**
**FRN No. 1218171W**

Head Office :- Sahakar Setu, Hutatma Gore Path, Buldana - 443001 Dist. Buldana (Maharashtra)

## Balance Sheet as on 31st March 2018 — ताळेबंद दि. ३१ मार्च २०१८

| Sr. No. | LIABILITIES | Schedule | Balance as on 31-03-2018 | Balance as on 31-03-2017 |
|---|---|---|---|---|
| 1 | Capital | 1 | 10758,85,620.00 | 10329,18,070.00 |
| 2 | Reserve & Surplus | 2 | 31318,84,986.02 | 27918,12,274.25 |
| 3 | Deposits | 3 | 543279,27,668.63 | 514088,09,959.61 |
| 4 | Borrowings | 4 | 75268,72,978.20 | 85011,93,527.53 |
| 5 | Other Liabilities & provisions | 5 | 44040,73,445.77 | 37748,49,904.05 |
| | **TOTAL CAPITAL & LIABILITIES** | | **704666,44,698.62** | **675095,83,735.44** |

| Sr. No. | ASSETS | Schedule | Balance as on 31-03-2018 | Balance as on 31-03-2017 |
|---|---|---|---|---|
| 1 | Cash & Balances | 6 | 9684,82,452.70 | 12166,14,871.91 |
| 2 | Balances With Banks & Money | 7 | 51128,04,369.89 | 39528,37,472.49 |
| 3 | Bank Investments, Other Inv. | 8 | 115865,13,766.74 | 134773,79,231.05 |
| 4 | Advances | 9 | 434920,94,543.28 | 403645,77,166.64 |
| 5 | Fixed Assets | 10 | 43271,08,707.82 | 38569,73,853.17 |
| 6 | Other Assets | 11 | 49796,40,858.19 | 46412,01,140.18 |
| | **TOTAL ASSETS** | | **704666,44,698.62** | **675095,83,735.44** |

The Schedule referred to above forms an integral part of the Balance Sheet.

